# प्रेसनोट

जा.क्र. ६८४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/१०/२०१६

## सन 2016-2017 करीता
## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारासाठी प्रस्तावाची मागणी

महिला व बाल विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा—या महिला व संस्थाकडुन सन २०१६—२०१७ करीता पुण्याश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारासाठी अर्जाची मागणी करण्यात येत आहे.

१) राज्यस्तरीय पुरस्कार १ लाख रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ, महिला व बाल विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामाचा २५ वर्षाचा सामाजीक कार्याचा अनुभव असावा ज्या महिलांना जिल्हास्तरीय पुण्याश्लोक अहिल्यादेवि होळकर पुरस्कार, दलित मित्र पुरस्कार अथवा सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्या महिला तो पुरस्कार मिळण्याच्या ५ वर्षापर्यत राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्राप्त राहणार नाही.

२) विभागीय पुरस्कार २५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानप्रत्र, शाल व श्रीफळ. महिला व बाल विकास क्षेत्रात संस्थेचे किमान ७ वर्ष कार्य असावे. नोंदणीकृत संस्थेस दलित मित्र पुरस्कार प्राप्त नसावा. संस्था राजकारापासुन अलिप्त असावी. तिचे कार्य व सेवा हि पक्षातील व राजकाणापासुन अलिप्त असावी.

३) जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवि होळकर पुरस्कार १० हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, समानप्रत्र, शाल व श्रीफळ. महिला व बाल विकास क्षेत्रात किमान १० वर्ष सामाजीक कार्य असावे ज्या महिलांना दलित मित्र पुरस्कार अथवा सावित्रीबाई फुले पुरस्कार प्राप्त झालेला आहे त्या महिलांना हा जिल्हास्तरीय पुरस्कार देता येणार नाही.

राज्यास्तरीय व जिल्हास्तरीय पुरस्कारसाठी उपविभागिय अधिकारी यांचे विना दुराचार प्रमाणपत्र,गैरवर्तनासंबधी खटला किंवा शिक्षा झाली नाही याबाबतचे तसेच सार्वजनीक संपत्तीचा अपहार न केल्याचे व राजकिय क्षेत्रात नसल्याचे पोलीस अधिकारी यांचे प्रमाणपत्र,प्रस्ताव धारकांचा कार्याचा तपशिल,वृत्तपत्र कात्रणे, सध्यां कोणत्या पदावर कार्यरत आहे. असल्यास त्याचा तपशिल, विभागस्तरीय पुरस्कारासाठी देखील वरीलप्रमाणे अहर्ता राहील. इच्छुक व्यक्ती किंवा संस्थांनी विहीत नमुन्यातील अर्जासाठी तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,शिवाजी स्टेडीयम भंडारा येथे संपर्क करावा.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.